Impact Factor – 3.452 ISSN-- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL


February-2018

SPECIAL ISSUE-XXXVII

# Indian Literature and Society

# भारतीय साहित्य और समाज

# भारतीय साहित्य आणि समाज



Guest Editor :

Dr. D. F. Shirude

Principal

M.G.V.'s S.P.H. Arts, Science & Commerce College, Nampur, Tal. Baglan, Dist.-Nashik

Executive Editor :

Dr. C. R. Patil (English)

Dr. R. P. Thakare (Hindi)

Prof. Sunil Jadhav (Marathi)

Chief Editor :

Dr. Dhanraj Dhangar

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
February 2018

Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2018

SPECIAL ISSUE-XXXVII

## Indian Literature and Society
## भारतीय साहित्य और समाज
## भारतीय साहित्य आणि समाज

Editorai Board

Guest Editor

Dr. D. F. Shirude,

Principal

M.G.V.'s S.P.H. Arts, Science and Commerece College,

Nampur, Tal. Baglan, Dist.-Nashik

Executive Editor

Dr. C. R. Patil (English)

Dr. R. P. Thakare (Hindi)

Prof. Sunil Jadhav (Marathi)

Chief Editor

Dr. Dhanraj Dhangar

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 500/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 47 : Indian Literature & Society
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 52 | बीसवी शताब्दी के अंतिम दशक कि लेखिकाओं कि कहानियों में सामाजिक चेतना | प्रा. ममता पंजाबी | 206 |
| 53 | हिंदी पत्रकारिता और साहित्यः स्वरुप एवं विवेचन | डॉ.नवनाथ गाड़ेकर | 210 |
| 54 | 'अग्निगर्भ' में भारतीय सामाजिक चित्र | डॉ.चेतनकुमार मोदी | 213 |
| 55 | जनसंचार माध्यमों में हिंदी का महत्व | डॉ.परमेश्वर काकडे | 217 |
| 56 | भारतीय साहित्य की अवधारणाः एक विचार | डॉ.जितेंद्रकुमार चौधरी | 220 |
| 57 | निर्मला पुतुल:अभिव्यक्ति का यथार्थ | प्रा.कृष्णदेव तिवारी | 224 |
| 58 | 'रश्मिरथी' में कर्ण चरित्रांकन | डॉ.पूनम बोरसे | 229 |
| 59 | कोरकू जनजाति की भाषा, संस्कृति और समाज का अध्ययन | प्रा.पन्नालाल धुर्वे | 233 |
| 60 | 'विष्णुविराट के नवगीतों में ग्राम विमर्श' | प्रा.व्ही.जी.राठोड | 237 |
| 61 | 'गोदान' के नारी-पात्रों में भारतीयता | डॉ.रुक्मणी पटेल | 241 |
| 62 | समकालीन हिंदी कहानी साहित्य में महानगर विमर्श (कमलेश्वर के कहानियों के संदर्भ में ) | डॉ. संजय दवंगे | 246 |
| 63 | भारतीय साहित्य कि अवधारणा | डॉ. मनिष पटेल | 249 |
| 64 | भारतीय साहित्य और समाज | डॉ. मुकेश वसावा | 252 |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 63 | साहित्यातील जात, लिंग, वर्ग, वर्णाच्या भेदभावाचे प्रतिबिंब | डॉ.नवनाथ गोरे | 256 |
| 64 | महाराष्ट्रीयन समाज आणि मराठी साहित्य | डॉ.राहुल पाटील | 259 |
| 65 | दलित साहित्यातील सामाजिकता | प्रा.ए.जी.नेरकर | 266 |
| 66 | साहित्याची सामाजिकता | डॉ.स्नेहल मराठे | 269 |
| 67 | भाषा, समाज आणि संस्कृति | प्रा.गणेश अहिरे | 272 |
| 68 | समन्वयशील दत्त संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान | डॉ.रविंद्र बेम्बरे | 275 |
| 69 | लोकहितवादींच्या निबंधातील सामाजिकता | प्रा.योगेश शेळके | 279 |
| 70 | समकालीन फॅशन आणि उपयोजित मराठी साहित्य | प्रा.गजानन भामरे | 282 |
| 71 | भारतीस साहित्यातील दलित साहित्याचे स्वरुप | प्रा.एस.जी.कन्नोर | 285 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

\- **Executive Editor**

**Published by -**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 47 : Indian Literature & Society
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# साहित्याची सामाजिकता

**डॉ. स्नेहल संजय मराठे**
सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग)
मसगा कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प
ता. मालेगाव, जि. नाशिक.

**प्रास्ताविक :**

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंब होय. बऱ्याचदा साहीत्यिकाला खऱ्या अर्थाने Social Animal असेही म्हटले जाते. म्हणजेच साहित्य आणि समाज हे परस्परपूरक घटक आहेत. लेखक ज्या समाजाचा घटक असतो. त्या समाजातच त्याच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असते. समाजजीवनातील सुख-दु:खे अत्यंत तीव्रपणे त्याच्या व्यक्तिमत्वात रुतलेली असतात. त्याच्या अवती-भोवती घडणाऱ्या घटनांतून तो निवडक घटना, व्यक्ती यांना आपल्या कल्पनाशक्तीच्या बळावर एक रुप देऊन आपल्या साहित्यकृतीतून वाचकांपुढे ठेवीत असतो. साहित्य, समाज आणि संस्कृती यांचे अत्यंत निकटचे संबंध असतात. हे घटक परस्परपूरक असतात.

**साहित्य आणि समाज यांचे अतूट नाते :**

प्रसिद्ध विचारवंत कॉडवेल म्हणतात, समाजजीवन हे शिंपल्याप्रमाणे असून साहित्य हे मौक्तिकाप्रमाणे आहे. या विधानातून साहित्य आणि समाज यांच्यातील अतूट नाते लक्षात येते. साहित्याची निर्मिती समाजात होते आणि साहित्याच्या जडणघडणीत, विकासात समाजाचे महत्त्वाचे योगदान असते. समाज साहित्याला अनुभव देतो. जीवन, सत्य आणि आशय देतो. साहित्य आणि समाज यांचा संबंध कोणालाही, कधीही कोणत्याही पातळीवर नाकारता येत नाही. ज्या साहित्याला समाजिक मानले जात नाही, त्यातही या ना त्या प्रकाराने सामाजिकता वावरत असते.

साहित्यातील समाजजीवनाचा अभ्यास करण्यासाठी साहित्य उपयुक्त ठरते. साहित्याच्या सामाजिक दृष्टीने अभ्यास करण्यामागे अनेक हेतू असतात. लेखक आणि समाज यांच्यातील नात्यावर प्रकाश टाकणे, साहित्यातील सामाजिकतेचे स्वरुप लक्षात घेणे, लेखकाच्या सामाजिक बांधिलकीचा विचार करणे, साहित्य समाज आणि संस्कृती यांचे विशेष अभ्यासणे, साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाचा शोध घेणे, साहित्यनिर्मितीमागे असलेल्या जीवनविषयक प्रेरणांचा वेध घेणे इत्यादी हेतू साहित्याच्या सामाजिक दृष्टीने केलेल्या अभ्यासाचे असतात.

साहित्य हे सामाजिक असते, हे म्हणजे सूर्य प्रकाशमान असतो असे म्हणण्यासारखे आहे. तरी देखील साहित्यात असामाजिक प्रवृत्तीची चर्चा होते. असामाजिक प्रवृत्ती या संकल्पनेचे वेगवेगळ्या संदर्भामध्ये दोन वेगवेगळे अर्थ संभवतात. एक व्यक्तिकेंद्रीत साहित्य आणि दोन परिवर्तनवादी साहित्य, व्यक्तीवादी साहित्य निर्माण करणारी व्यक्ती असते. ही व्यक्ती समाजाचा घटक असते. व्यक्तीच्या मनाचे समाजाशी संबंध असतात. व्यक्तिवादी साहित्यात कोणत्या ना कोणत्या रुपात सामाजिकता असतेच. त्यामुळे व्यक्तिकेंद्रीत साहित्य असामाजिक असते, असे मानणे हेच चुकीचे आहे.

तसेच परिवर्तनवादी साहित्यही असामाजिक नसते. प्रतिक्रांतिवादी साहित्यिकही मन वजा करुन साहित्य निर्माण करु शकत नाहीत. साहित्याचा आस्वाद मने घेतात. साहित्य शब्दांमधून साकार होते. शब्द अनुभव प्रकट करतात. अनुभव अनेक भावघटकांनी संघटित होतो. या सर्वच पातळ्यांवर मुल्यांचा वावर आहे. साहित्यकला ही एखाद्या पोकळीतून निर्माण झालेली वस्तू नसते. केवळ एखाद्या व्यक्तीची कृती किंवा निर्मिती नसते. काळाशी आणि स्थलाशी बद्ध अशा सर्वनशील लेखकाची ती निर्मिती असते. सामाजिक वातावरण त्याचा आवाका किंवा विस्तार आणि

ISSN : 2348-7143
February 2018

कलावंतांचा प्रतिसाद हे सर्व साहित्यकृतीच्या आकलनाच्या दृष्टीने समजून घ्यावे लागते. साहित्य निर्मितीचे एकच कारण नसते. कारणाम् अनेकता असते. साहित्य निर्मितीचे एकच कारण अथवा एकच हेतू मानला तर साहित्यनिर्मितीचा व्यवहार एकविध होईल.

**साहित्य आणि समाजनिष्ठा :**

साहित्य हा समाजजीवनाशी, मानवी जीवनाशी निगडीत असा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. साहित्याचा निर्माता साहित्याचा वाचक व साहित्याचा समीक्षक हे त्या उपक्रमाशी संबंधीत असतात. साहित्यातून मानवी मनातील भावनांचा अविष्कार होतो. व्यक्तीचे सगळे अनुभव हे शेवटी त्याच्या व तो ज्या समाजाचा घटक आहे, त्या समाजाच्या भौतिक किंवा अध्यात्मिक संपन्नतेशी किंवा विपन्नतेशी निगडित असतात आणि कोणत्याही समाजगटाची भौतिक व आधात्मिक संपन्नता किंवा विपन्नता ही अखिल मानवी समाजाच्या संपन्नतेशी किंवा विपन्नतेशी निगडीत असते. म्हणूनच कोणत्याही मानवी उपक्रमाचा विचार करताना व्यक्ति, समाज आणि अखिल मानवी समाज यांचा परस्परांशी संबंध लक्षात घेतलाच पाहिजे साहित्य हा देखील मानवी जीवनाचा उपक्रम आहे आणि म्हणूनच व्यक्ती आणि बहुजनसमाज अंतर्भाव व सहभाग त्यात होणे आवश्यक आहे. आता बहुजन समाजाच्या सर्व स्तरांमधून नव्या वृत्तीचे, नव्या दृष्टीचे, नव्या प्रवृत्तीचे, नव्या विचारांचे लेखक, कलावंत उद्याला येत आहेत. दलित, ग्रामीण, आदिवासी, भटक्या, विमुक्तांच्या साहित्यातून नवे अनुभव, नवे सत्य, नवी मूल्ये प्रगट होत आहे. खऱ्या अर्थाने साहित्य बहुजनानिष्ठ होऊ पहात आहे. समाजनिष्ठेचा अभाव प्रस्थापित साहित्यात जाणवू लागला आणि तीच समाजनिष्ठा या नव्या साहित्य प्रवाहात भावरुपाने प्रत्ययाला येत आहे.

**साहित्याची सामाजिकता :**

साहित्याची सामाजिकता ही माणसाच्या सामाजिकतेसारखीच एक वस्तुस्थिती आहे. साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधाला एक परिमाण असते. सामान्यपणे समाजाचे भूषण किंवा अलंकार म्हणून साहित्याकडे समाज बघत असतो. आपल्या रसिकतेचे, कलाभिरुचीचे संवर्धन करणारी एक निर्मिती म्हणून सामान्यपणे साहित्याकडे आदरपूर्वक पाहिले जाते. प्रगत समाजात साहित्यनिर्मितीचा एक इतिहास असतो तो सांस्कृतिक दृष्टीने अर्थपूर्ण असतो. साहित्याच्या सामाजिकतेचा वर्णनात्मक रीतीने वेध घेताना प्रथम समाज व साहित्य यांच्या परस्परसंबंधाचा मागोवा घ्यावा लागतो. समाजात निर्माण होणारी प्रत्येक गोष्ट ही समाजाची काही एक गरज भागविणारी गोष्ट असते. सामाजिक गरजपूर्तीच्या कारणाखेरीज समाजात काहीच निर्माण होऊ शकत नाही व झालेल्या निर्मितीला समर्थनही लाभत नाही. या दृष्टीने साहित्य हे समाजाची सांस्कृतिक गरज भागविणारी निर्मिती असते. मार्क्सवादी कल्पनेप्रमाणे समाजाच्या आर्थिक पायावर कलासाहित्याची अधि-संरचना उभी असते. म्हणूनच समाजाच्या स्थितीगतीचा परिणाम साहित्यनिर्मितीवर होत असतो. त्याचप्रमाणे समाज अनेक प्रकारच्या अपेक्षा साहित्याकडून करीत असतो.

मनोरंजन, उद्‌बोधन यांसारख्या सर्वसामान्य अपेक्षेप्रमाणेच समाजाच्या काही उद्दिष्टांसाठी, काही व्यवस्थेसाठी, काही सुरक्षिततेसाठी साहित्याने काही विधिनिषेध पाळावेत. अशीही समाजाची अपेक्षा असते. समाजाच्या जीवनविषयक मूल्यकल्पना असतात, त्यांना अबाधित राखण्याचे कार्य सर्वच सामाजिक घटकांना करणे भाग असते. समाजाची ज्या प्रकारची स्थितीगती असेल, ज्या प्रकारचे कालाचे आव्हान असेल, ज्या प्रकारच्या जीवनविषयक मूल्यकल्पना असतील, त्यावर साहित्य व समाज यांचे परस्परसंबंध अवलंबून असतात.

साहित्याची निर्मिती करणारा लेखक, त्याचाही सामाजिकतेच्या दृष्टीने विचार करावा लागतो. एक प्रकारच्या आंतरिक प्रेरणेने, अंत:स्फुर्तीने हा लेखक साहित्य निर्माण करीत असतो. सामाजिक पर्यावरणाचा प्रभाव लेखकाच्या मनावर पडत असतो. सभोवतालचे संस्कार त्या मनावर होत असतात. मनावर झालेल्या संस्कारांचा प्रभाव त्याच्या साहित्यकृतीतून दिसून येतो. लेखकाला आपल्या साहित्यकृतीतून काय सांगावयाचे आहे, त्याची कल्पक मांडणी

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 47 : Indian Literature & Society
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

तू वैश्य, तू शुद्र असे हिणवू नये.
एक तीळ सर्वांनी करडून खावा, माणसावरच सूक्त रचावे,
माणसाचेच गाणे गावे माणसाने."

तसेच फ.मु. शिंदे यांचे मत ही येथे लक्षात घ्यावे लागेल. ते म्हणतात, "मुक्ती लढयातून स्फुरलेले साहित्य किती अस्सल आहे, असतं हे दलित साहित्यातून दिसून येते. विश्वात्मकता हा साहित्याचा धर्म मानला तरी दलित साहित्यातील विश्वात्मकता भारतीय साहित्याला सापडणार नाही". हाही विचार भावी काळात प्रभावीपणे दलित साहित्याने आविष्कृत करावा.

आज समाजजीवन व राष्ट्रजीवन प्रगत होणारे साहित्य निर्माण होत नाही. आपल्या स्वतंत्र देशाला एकात्मतेची व बंधुत्वाची नितांत गरज आहे. म्हणून साहित्य कलेतून मानवतावादी शास्त्र निर्माण झाले पाहिजे. प्राचार्य, म.भि. चिटणीस म्हणतात त्याप्रमाणे, "भारतीय समाजाला नीतिमान बनविणे हे दलित साहित्याचे प्रयोजन असले पाहिजे. एकंदरीत मराठी साहित्यात निर्मिती करु इच्छिणाऱ्या दलित साहित्याने सर्वच मराठी साहित्य परंपरांचा डोळसपणे आणि पूर्वग्रहदूषित न होता नव्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्याची गरज आहे. दलित साहित्याने व्यापक दृष्टीकोन बाळगावा.

**संदर्भ :**

१) दलित साहित्य : काही विचार आणि दिशा - डॉ.प्रकाश कुमार
२) मराठी साहित्यातील स्पंदने - गो.म.कुलकर्णी